# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनीक्रमांक :०२०-२६१२३३७१, Email Id collector.pune@maharashtra.gov.in


क्र. जि.का./आ.व्य./कावि/ २४२ /२०२१

दिनांक :१२/०३/२०२१

वाचले:-

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापनअधिनियम २००५.
३. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० , ३३ , ३४ , ४१वकलम५१,
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०.१४/०३/२०२० ,१५/०३/२०२० रोजीची अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४मार्च २०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१७९४/१८१८/२३९९/२३८८/२८६५/२०२० दि.२३ जुन २०२०, दि. २५ जुन २०२०, दि.२८ ऑगस्ट, २०२०, दि.२६ ऑगस्ट २०२०, दि.२३ सप्टेंबर २०२०,
७. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/२५१४/२०२० दि.०४ सप्टेंबर २०२०
८. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक ३०/१०/२०२० रोजीचे आदेश.
९. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.सा.प्र.२/आरआर/५१/२०२१, दि.०५.०१.२०२१
१०.उपसचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं- संकीर्ण८२२०/ प्र.क्र.२२४/सा.का.४, दि.०५/०१/२०२१.
११.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक 29/01/2021 रोजीचे आदेश.
१२. .महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रं.कोरोना-२०२०/सीआरक्रं.८५/अेअे-५ दि.१७.०२.२०२१
१३.या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./ आ.व्य./कावि/१५८/२०२१ दि.१८ फेंब्रुवारी २०२१
१४.मा.उपमुख्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षते खाली दि.२१/०२/२०२१ रोजी झालेली बैठक
१५.या कार्यालयाकडील आदेश क्र. जि.का./आ.व्य./कावि/१७६/२०८ /२०२१, दि.२१/०२/२०२१ व दि.२८.०२.२०२१ रोजीचा आदेश
१५. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-१. दिनांक २४/०२/२०२१ रोजीचे आदेश.
१६. मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षते खाली दि.१२/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील सुचना

---

**विषय :- कोव्हीड १९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने पारित केलेले आदेश, निर्देश,SOP इत्यादींचे प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

जिल्हाधिकारी पुणे

## आदेश

**ज्याअर्थी,** उपरोक्त वाचा.४ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिद्ध केले असून यातील नियम क्रं.३ नुसार कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रणयासाठी जिल्हाधिकारी यांना त्याचे कार्यक्षेत्रात सक्षमप्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**ज्याअर्थी,** संदर्भ क्र.१५ च्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक अन्वये पुणे जिल्हयात कोव्हिड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी **दि.३१/०३/२०२१** पर्यंत वाढविला आहे व या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्रमांक ४ ते १६ मध्ये नमूद आदेशान्वये तसेच या कार्यालयाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

**आणि ज्याअर्थी,** दि.१२ मार्च २०२१ रोजी. मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेचे अनुषंगाने पुणे जिल्हयाचे मा. खासदार,मा. आमदार ,मा. महापौर पुणे व प्रशासकीय अधिकारी तसेच इतर मान्यवर यांच्या समवेत झालेल्या बैठकी मध्ये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**पुणे** मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणुच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेबाबतचे आदेश देत आहे.

१) कोरोना बाधीत परिसरात हॉट स्पॉट Incident Commander घोषित करावा.हॉटस्पॉट घोषित करताना वेगवेगळ्या कुंटुंबातील सर्व व्यक्ती मिळुन संख्या १० पेक्षा अधिक असावी. सक्रिय रुग्ण (Active Cases) परिसर प्रतिबंधित क्षेत्र (Containement Zone) Incident Commander यांनी घोषित करावा.

२) ग्रामीण कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत/नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणुची प्रभावी उपाययोजनेसाठी सर्व प्रकारचे मॉल,सिनेमागृह, दुकाने (अत्यावश्यक वस्तु व सेवा उदा.वृत्तपत्र, दुध, भाजीपाला, फळे, औषधे, हॉस्पिटल,ज्या उदयोगांचे शिफ्ट मध्ये कामकाज चालते अशा संबंधीत अस्थापनेवरील कर्मचारी व त्यांची वाहने , आरोग्य विषयक सेवा वगळता)रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील कोणतेही व्यक्तीस अत्यावश्यक कारण /सेवा वगळता **रात्री ११.०० ते सकाळी ६.०० पर्यंत पुढील आदेश होई पर्यंत संचार करणेस प्रतिबंध राहतील.**

३) पुणे जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगीशाळा/महाविदयालये / इतर शाळा **दि.३१/०३/२०२१ पर्यंत बंद ठेवण्याचा आदेश देत आहे.**मात्र ऑनलाईन पध्दतीने शाळा/महाविदयालये / इतर शाळा सुरु राहतील तसेच सर्व कोचिंग क्लासेस (MPSC,UPSC वगळुन )३१ मार्च २०२१ पर्यंत बंद राहतील. MPSC,UPSC क्लासेस आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेनुसार त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना /अटीच्या अधीन राहुन सुरु राहतील पुणे जिल्हयातील **१० वी व १२ वी** च्या विदयार्थ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी संबधित शिक्षणाधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांनी आवश्यक त्या उपाययोजना करुन १० वी व १२ वी चे वर्ग सुरु ठेवणेत यावेत.

४) पुणे जिल्हयातील **१०वी व १२वी वगळता इतर** नियोजित परिक्षा आवश्यक असल्यास कोरोना १९ विषाणुच्या उपाययोजनांचे पालन करुन घेण्यात याव्यात. शक्यतो ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात याव्यात.

५) पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील प्रतिबंधीत क्षेत्राबाहेरील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, लॉज, बार, फुडकोर्ट इत्यादी आस्थापना त्यांच्या आसन **क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.**तथापी ॲपद्वारे किंवा हॉटेल मार्फत पार्सल सेवा /घरपोच सेवा रात्री ११.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.सदर आस्थापनांनी त्यांच्या हॉटेल /रेस्टॉरंट मधील ग्राहकांचे उपस्थिती बाबत दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.त्यांनी दर्शनी भागावर हॉटेलची एकुण आसन क्षमता आणि हॉटेल मध्ये उपस्थितीत ग्राहक यांची संख्या दर्शविणारा बोर्ड दर्शनी भागावर लावने बंधनकारक आहे.

६) सर्व गृहनिर्माणसंस्था मधील क्लब हाऊस ३१/३/२०२१ पर्यंत बंद राहतील. तसेच सर्व गृहनिर्माणसंस्थाच्या ठिकाणी असणाऱ्या क्लब हाऊसेस मधील कार्यक्रमांची तपासणी संबधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षक यांनी करावी कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने नियमांचे उल्लघंन केल्याचे आढळल्यास संबधित गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन /अध्यक्ष व सचिव जबाबदार राहतील.

७) **लग्न समारंभ व इतर सामाजिक राजकीय धार्मिक कार्यक्रम** जास्तीत जास्त ५० व्यक्तींच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील.. तथापि खुले मंगल कार्यालय/लॉन्स/मैदाने या **ठिकाणी १००** व्यक्तींच्या उपस्थितीत परवानगी राहील. कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी संबधित पोलीस स्टेशन मधून रितसर परवानगी घेणे अनिवार्य

राहील. लग्न समारंभाचे ठिकाणी उपस्थित सर्व नागरिक, वाढपी, आचारी, वाजंत्री, भटजी व वऱ्हाडी मंडळी यांनी मास्क वापरणे बंधनकारक राहील.

- लग्न समारंभाकरिता जास्तीत जास्त ५० व्यक्तींना परवानगी राहील. लग्न समारंभास संबधित पोलीस स्टेशन यांनी ६ तासात परवानगी द्यावी. परवानगी न दिल्यास उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे अपील दाखल करावे. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी २४ तासात निर्णय घ्यावा. परवानगीबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
- लग्न समारंभासाठी विनावातानुकूलित मंगल कार्यालय/ हॉल/ खुले लॉन/सभागृह वापरणेत यावी. कोणत्याही परिस्थीतीत सेंट्रल **वातानुकूलित सेवेचा** (AC) चा वापर करणेत येऊ नये.
- मंगल कार्यालय व्यवस्थापक / मालक यांनी लग्न समारंभाचे प्रवेशव्दाराजवळ ऑक्सीमीटर, इन्फ्राथर्मामीटर (थर्मल स्कॅनिंग गन) चा वापर करावा. प्रवेशव्दाराजवळ उपस्थितांचे नाव, मोबाईल क्र व स्वाक्षरी घेण्यात यावी.
- लग्न समारंभाची जागा, वारंवार हाताळले जाणारे भाग, खुर्च्या, लग्नाचा संपूर्ण हॉल, किचन, जेवणाचे ठिकाण,स्वच्छतागृह इत्यादी ठिकाणी सनिटायझरचा वापर करुन वारंवार निर्जंतुकीकरण करावे. तसेच स्वच्छतागृहात हात धुण्यासाठी साबणाची व्यवस्था करावी,
- लग्न समारंभात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व सर्व नियम व अटी पालन करण्याबाबत जनजागृती करावी.
- लग्नसोहळयाचा सर्व विधीची पाहणी करण्यासाठी **पोलीस पाटील, ग्रामसेवक, कामगार तलाठी व पोलीस यांचे भरारी पथक कार्यरत करावे**. या ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्यास जागा मालकाविरुध्द कारवाई करण्यात येऊन कार्यालय /सभागृह सील करण्यात येईल. लग्नानंतर संबधित परवाना धारकाने हार्ड कॉपी (चित्रीकरणाची सीडी) अहवाल ३ दिवसांचे आत संबधित पोलीस स्टेशनकडे जमा करावा. अहवाल सादर न केल्यास कारवाईस पात्र राहतील.

८) सर्व जास्तीत जास्त ५० टक्के क्षमतेनुसार परवानगी देणेत आलेल्या आस्थापनेच्या ठिकाणी ५० टक्केपेक्षा जास्त क्षमतेचे नागरिक आढळुन आल्यास संबधित आस्थापनेवर तात्काळ पोलीस विभागाने दंडात्मक कार्यवाही करावी.

९) अंत्यसंस्कार,दहन विधी ,दफन विधी ,दशक्रिया विधी व त्याच्याशी निगडीत कार्यक्रम देखील **जास्तीत जास्त ५० व्यक्तींचे** उपस्थितीत पार पाडणेत यावेत.

१०) तालुका स्तरावर हॉटस्पॉट करिता दोन तांत्रिक सहाय्यकांची नेमणुक तालुका आरोग्य अधिकारी व गट विकास अधिकारी यांनी करावी. संबधित तांत्रिक सहाय्यकांचा खर्चाबाबत प्रस्ताव तालुका आरोग्य अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे पाठवावा. सदरचा खर्च NHM निधीतुन करण्यात यावा.

११)हॉटस्पॉट परिसरातील नागरिकांनी कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने आरोग्य तपासणी करावी.

१२) सुपरस्प्रेडर व्यकतींची १०० टक्के आरोग्य तपासणी करावी उदा. दुकानदार,भाजीपाला विक्रेते इ.

१३) सक्रिय रुग्ण (Active Cases) असलेल्या परिसरामध्ये एकुण रुग्ण संख्येच्या पाच पट दंडात्मक कारवाई केसेस पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी नेमणुक केलेल्या पथकाने कराव्यात.

१४)ग्रामीण कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत/नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद कार्यक्षेत्रामध्ये सामाजिक अंतर ( Social Distancing) पालन होत नसल्यास पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे पथकाने कारवाई करावी.

१५)सर्व कंपनी आस्थापनाच्या ठिकाणी कामगारांच्या शिफ्टचे नियोजन करण्यात यावे त्याप्रमाणे वेळापत्रक दर्शनी भागात लावावे.कामगार अधिकारी /कर्मचारी यांच्या जाण्या-येण्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार असावेत.सर्व कंपनी आस्थापनाच्या ठिकाणी सोशल डिस्टसींग ,मास्क,सॅनिटाझर, व इतर कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.सर्व कामगार आस्थापनांची वेळोवेळी तपासणी कामगार उप आयुक्त कार्यालय यांच्या पथकाने करावी. **औद्यागिक क्षेत्रात प्रादेशिक अधिकारी यांनी कामगार विभागाचे मदतीने पथक नेमणुक करुन तपासणी करावी.**

१६) डॉक्टर हेल्थ अॅण्ड फॅमिली वेलफेअर इन्सटीटयुट यांनी कोव्हीड-१९ टास्कफोर्ससोबत चर्चा करुन कोव्हिड-१९ च्या उपचाराबाबत प्रोटोकॉल निश्चित करावा.निश्चित केलेल्या कोव्हीड-१९ उपचाराबाबत **पुणे ग्रामीण भागातील सर्व डॉक्टरांना Basic आणि Advance Protocol चे प्रशिक्षण द्यावे.**सदर प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी ते प्रमाणपत्र रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावावे.

१७)कोव्हीड-१९ लसीकरणाकरिता रेशकार्ड पुरावा व निवडणुक ओळखपत्र ,आधारकार्ड पुरावा ग्राह्य धरुन ४५ ते ६० वयोगटातील व्यक्तींची कोव्हीड अॅप मध्ये नोंदणी आरोग्य विभागाने करावे. तालुकास्तरीय आरोग्य यंत्रणेने गावनिहाय लसीकरणांचे नियोजन करावे

१८)लसीकरणाबाबतचा आढावा वैद्यकिय अधिकारी, सीएचओ, आरोग्य सेविका यांनी घ्यावा याबाबतचे सनियंत्रण तालुका आरोग्य अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी करावे.

१९) घर विलगीकरणातील व्यक्तींनी सोशल डिस्टन्सींग,मास्क, सॅनिटाझरचा व कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने इतर सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

२०)तालुकास्तरावरील CCC/DCHC पुर्ण क्षमतेने कार्यन्वीत करावीत.सदर ठिकाणी सक्रिय रुग्ण (Active Cases) **संख्येच्या १५ पट क्षमता तयार ठेवावी.**

२१)पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष प्रमुख यांनी Contact Tracing मधील High Risk व Low Risk व्यक्तींची माहिती आरोग्य यंत्रणेला द्यावी. सदरकामी त्यांनी संबधित बीट अंमलदार व आशा सेविका यांनी मदत करावी. सदरचा अहवाल CHO / MO यांना सादर करावा.

२२) कोव्हीड-१९ प्रकल्प आराखडयाअंतर्गत मंजुर कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार पुर्ननियुक्ती आदेश देण्यात यावेत.

२३) प्रवासी वाहतुक करणाऱ्या सर्व प्रवाशांना आरोग्य सेतु अॅपचा वापर करणे बंधनकारक आहे.सदर बाबींचे उल्लघंन आढळलेस पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग यांनी कारवाई करावी.

२४)जिल्हा परिषद पुणे यांचेकडील आयडीएसपी कक्ष यांनी एनआयसी पुणे यांचे संपर्कात राहुन आरोग्य सेतु व आरोग्य विषयक डाटा अदयावतीकरण करावा.

२५)पानटपरी व्यवसायिकांनी सदर ठिकाणी **ग्राहकांची एकाच वेळी पाच ग्राहकांपेक्षा जास्त व्यक्तींची गर्दी करु नये.**गर्दी झाल्यास पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थेने दंडात्क कारवाई करावी.

२६)आठवडे बाजार शिफ्टमध्ये भरविणेबाबत स्थानिक संस्थांनी नियोजन करावे.**आठवडे बाजाराबाबत संपुर्ण जबाबदारी हि स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.**

२७) केटरींग व्यवसायिक यांनी **जास्तीत जास्त ५० मर्यादेत ऑर्डर स्वीकाराव्यात** सदर ठिकाणी ५० पेक्षा जास्त व्यक्ती आढल्यास सदर केटरींग व्यवसायावर दंडात्मक कारवाई करावी.

**२८)जिल्हाधिकारी कार्यालयाने यापुर्वी निर्गमीत केलेले आदेश /मार्गदर्शक सुचना पुढील आदेश पर्यंत लागू राहतील.**

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी उल्लघंन केल्यास त्यांचे विरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि साथरोग कायदा, १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे इतर अधिनियम व कायद्यातील इतर नियमान्वये योग्य ती कायदेशी रकारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**सदर आदेशाची अंमलबजावणी दि.१२/०३/२०२१ पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.**

(डॉ.राजेश देशमुख)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

प्रतः-
१. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२. पोलीस अधीक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
३. उप वनसंरक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४. जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र.जि. का. पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. जिल्हामाहितीअधिकारी, पुणेयांनाव्यापकप्रसिध्दीसाठी
१०. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
११. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा..जि. प. पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१२. सहाय्यक आयुक्त, अन्न वऔषध प्रशासन, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. असिस्टंट इंन्सिडंट कमांडर तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१४. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१५. मुख्य कार्याकारी अधिकारी छावणी परिषद, मुख्याधिकारी सर्व नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
16. सर्व संबंधितास आस्थापना प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अनुपालनास्तव,